# पनवेल महानगरपालिका

दीनदयाळ अंत्योदय योजना -राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान

## "जाहीर आवाहन"

**पनवेल महानगरपालिकेची तक्रार निवारण व विवाद निर्णय समिती स्थापन करणेकरीता सदस्य पदासाठी इच्छुकांचे अर्ज मागविणेबाबत (फेरजाहिरात व शुद्धीपत्रक)**

पथविक्रेता (उपजीविकेचे संरक्षण आणि पथविक्री विनियमन) अधिनियम- २०१४ चे कलम २० आणि महाराष्ट्र पथ विक्रेता (उपजीविका संरक्षण व पथ विक्री विनियमन) (महाराष्ट्र) नियम, २०१६ मधील प्रकरण २ नियम क्र. ३, ४ मधील तरतुदीनुसार तसेच नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांचे कडील दिनांक १०/०८/२०२६ च्या प्राप्त पत्रानुसार महानगरपालिकेमध्ये "तक्रार निवारण व विवाद निर्णय समिती" स्थापन करण्याबाबत नमूद केले आहे.

त्यानुसार सदर समितीत एक अध्यक्ष आणि इतर दोन व्यावसायिक अनुभवी सदस्य यांची समिती बनलेली असेल अशी तरतूद आहे. "तक्रार निवारण व विवाद निर्णय" समितीच्या अध्यक्ष व सदस्यांचा कालावधी पाच वर्ष इतका असेल. सदर "तक्रार निवारण व विवाद निर्णय" समितीमध्ये खालील अर्हता व अनुभव असलेल्या व्यक्तींकडून सदस्य या पदासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत.

| पदाचे नाव | पद संख्या | अ. क्र | अर्हता व अनुभव |
|---|---|---|---|
| तक्रार निवारण व विवाद निर्णय समिती सदस्य | २ | १ | सदर व्यक्ती पस्तीस वर्षाहून अधिक वयाची असेल परंतु पासष्ट वर्षापेक्षा अधिक वयाची नसेल.<br>The person is above thirty five years but is not more than sixty five years of age; |
| | | २ | सदर व्यक्ती मान्यताप्राप्त विद्यापीठाची स्नातक पदवी धारण करीत असेल.<br>The person possesses a Bachelor's degree from a recognized University; |
| | | ३ | सदर व्यक्तीला स्थानिक प्राधिकरणांमधील कामाचा अनुभव असेल किंवा शासनाचा अवर सचिव किंवा तत्सम दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेला अधिकारी म्हणून स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये तिने काम केलेले असेल.<br>The person has worked in local self-Government or as an officer not below the rank of Under Secretary to the Government or equivalent, having experience in local authority, |
| | | ४ | सदर व्यक्ती कार्यकुशल, सचोटी व प्रतिष्ठा असलेली व्यक्ती असेल आणि सामाजिक कार्यामधील अथवा पथविक्रेत्यांशी किंवा सार्वजनिक कामाशी किंवा नागरी वा सार्वजनिक प्रशासनाशी संबंधित समस्या हाताळण्याचे किमान दहा वर्षांचे पर्याप्त ज्ञान वा अनुभव असलेली असेल,<br>The person of ability, integrity and standing and has adequate knowledge or experience of, at least, ten years in social work or in dealing with the problems relating to street vendors or of public affairs or of municipal or public administration; |

तरी, पात्र इच्छुक व्यक्तींनी आपले अर्ज दिनांक ३१/०८/२०२६ पर्यंत आवश्यक त्या कागदपत्रांसह पनवेल महानगरपालिका आवक-जावक विभागात सादर करावेत. याविषयी अधिक माहितीसाठी पनवेल महानगरपालिका दीनदयाळ अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाटयगृहाच्या शेजारी शॉपिंग कॉम्प्लेक्स दत्त झेरॉक्स च्या वर दुसरा मजला येथे संपर्क साधावा.

**सही/-**
**(अभिषेक पराडकर)**
उपायुक्त
पनवेल महानगरपालिका

जा.क्र / पमपा /DAY-NULM/SUSV/२४२६/प्र.क्र २४ /१४४७/ २०२६
दिनांक - २४/०८/२०२६